**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**गुरुवार दिनांक २३ एप्रिल २०२६**

**ठळक बातम्या**

1. **महिला आरक्षण विधेयकावरून भाजपचे ज्येष्ठ नेते केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांची विरोधकांवर टीका.**
2. **131 वी घटनादुरुस्ती अमान्य झाल्यापासून भाजप काँग्रेस पक्षाला महिला विरोधी ठरवण्याचा प्रयत्न करत असल्याचा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा आरोप.**
3. **बुलढाणा जिल्ह्यात १६ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र तसंच ५१ नवीन उपकेंद्र सुरू करण्याची केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांची घोषणा.**

**आणि**

4. **सीबीएसईची इयत्ता दहावीची गुण सुधारण्यासाठीची परीक्षा १५ मे पासून.**

**आता सविस्तर बातम्या .......**

मंत्री सी आर पाटील

अनेक दशकांपासून विरोधी पक्षांनी महिलांना त्यांच्या हक्कांपासून जाणीवपूर्वक वंचित ठेवले. देशातील महिलांना आरक्षण मिळावे यासाठी प्रामाणिक प्रयत्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. परंतु ममता बॅनर्जी या महिला मुख्यमंत्रीपदी असूनही त्यांनी या विधेयकाला विरोध केला असं मत भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील यांनी आज नागपूर इथं पत्रकार परिषदेत व्यक्त केलं. या विधेयकाला लोकसभेमध्ये नामंजूर झाल्यानंतर जो जल्लोष विरोधकांनी केला तो निषेधात्मक असल्याचं देखील त्यांनी सांगितलं. यावेळी काँग्रेस नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी पंतप्रधानांसंदर्भात वापरलेल्या आक्षेपार्ह विधानांवर त्यांनी टीका केली -

या पत्रकार परिषदेत उत्तर प्रदेशच्या राज्यसभा खासदार दर्शनासिंग तसेच नागपूरच्या राज्यसभा खासदार मायाताई ईवनाते प्रामुख्याने उपस्थित होत्या.

विजय वडेट्टीवार

131सा वी घटनादुरुस्ती अमान्य झाल्यापासून भारतीय जनता पक्षामध्ये अस्वस्थता आहे. काँग्रेसला महिला विरोधी ठरवण्याचा अयशस्वी प्रयत्न भारतीय जनता पक्षातर्फे करण्यात

येत आहे. महिला आरक्षण असलेल्या प्रस्तावात कुठेही नारीशक्ती वंदन असा उल्लेख नसल्याची बाब काँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्पष्ट केली. ते आज नागपुरात पत्रकारांना संबोधित करत होते. 33% आरक्षण यापूर्वीच मंजूर झाल्यानं या विधेयकाच्या माध्यमाने महिलांना समोर करून परिसिमन विधेयक मंजूर करून घेण्याचा भारतीय जनता पक्षाचा डाव असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

निवडणूक मतदान

बारामती आणि राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी आज मतदान झालं. राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार सुप्रिया सुळे आणि पार्थ पवार, आमदार रोहित पवार यांनी बारामतीत मतदान केलं. राहुरीत उमेदवार अक्षय कर्डिले यांनी मतदानाचा हक्क बजावला. १ वाजेपर्यंत बारामतीमध्ये सुमारे ३२ टक्के आणि राहुरीत २९ टक्क्यांहून अधिक मतदान झालं होतं.

इंधन वाढ खंडन

पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये संभाव्य वाढीची शक्यता वर्तवणाऱ्या बातम्यांचं पेट्रोलियम मंत्रालयानं खंडन केलं आहे. अशा प्रकारचा कोणताही प्रस्ताव सरकारच्या विचाराधीन नसल्याचं मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. गेल्या चार वर्षांत पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतींमध्ये वाढ न झालेला भारत हा एकमेव देश असल्याचं मंत्रालयानं अधोरेखित केलं आहे. आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमतींमध्ये होणाऱ्या दरवाढीचा नागरिकांना फटका बसू नये, यासाठी सरकार आणि सार्वजनिक क्षेत्रातील तेल कंपन्यांनी महत्त्वपूर्ण पावलं उचलली असल्याचं मंत्रालयानं म्हटलं आहे.

नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र

केंद्रीय आयुष आणि आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी बुलढाणा जिल्ह्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून लवकरच १६ नवीन प्राथमिक आरोग्य केंद्र तसेच ५१ नवीन उपकेंद्र सुरू करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी काल जिल्हाधिकारी कार्यालयात आरोग्य यंत्रणेचा सविस्तर आढावा घेतला. या आढावा बैठकीत जिल्ह्याच्या पायाभूत सुविधांचा सविस्तर लेखाजोखा मांडण्यात आला. सध्या जिल्ह्यात १ शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, १ जिल्हा रुग्णालय, १ जिल्हा स्त्री रुग्णालय, १ जिल्हा क्षयरोग रुग्णालय, ३ सामान्य आणि उपजिल्हा रुग्णालये, १४ ग्रामीण रुग्णालये, ५७ प्राथमिक आरोग्य केंद्रे, २८२ उपकेंद्रे, १० हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना आणि ४० नागरी आयुष्मान आरोग्य मंदिरे कार्यरत आहेत. जिल्ह्याचा जन्मदर १३.९२ असून

बालमृत्यू दर ८.०९ आणि  माता मृत्यू दर २३ इतका कमी राखण्यात जिल्ह्याला यश आलं आहे, असं ते म्हणाले.

## जलसंधारण पुरस्कार

जलसंपदा, जलसंधारण आणि पाणीपुरवठा क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्यांना दिला जाणारा राज्यशासनाचा जलभूषण पुरस्कार २०२२ जाहीर झाला आहे. या पुरस्कारांमध्ये प्रथम क्रमांक यंदा अमरावतीतल्या डॉ. विजय देशमुख यांनी पटकावला आहे. दुसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार छत्रपती संभाजीनगर इथल्या नरहरी शिवपुरे यांना तर तिसऱ्या क्रमांकाचा पुरस्कार पुण्याच्या भजनदास पवार यांना जाहीर झाला आहे.

## १० वीच्या परीक्षेचा दुसरा टप्पा

केंद्रीय माध्यमिक शिक्षण मंडळ १० वीच्या परीक्षेचा दुसरा टप्पा १५ मे २०२६ पासून आयोजित करणार असून ही परीक्षा पूर्णपणे ऐच्छिक आहे. ज्या विद्यार्थ्यांना पहिल्या टप्प्यात मिळालेल्या गुणांमध्ये सुधारणा करायची आहे, त्यांच्यासाठी ही संधी असून सर्व उत्तीर्ण विद्यार्थी विज्ञान, गणित, सामाजिक शास्त्र आणि भाषा यांपैकी कोणत्याही तीन विषयांत आपला निकाल सुधारण्यासाठी ही परीक्षा देऊ शकतात. बोर्डाने १० वीच्या पहिल्या मुख्य परीक्षेचे निकाल १५ एप्रिल रोजी जाहीर केले होते. राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार घेतलेला हा निर्णय विद्यार्थ्यांना एकाच शैक्षणिक वर्षात दुसरी संधी देऊन त्यांच्यावरील परीक्षेचा ताण कमी करण्याच्या उद्देशाने घेण्यात आला आहे.

## शिवाजी कोण होता?-सपकाळ

शिवाजी कोण होता? या गोविंद पानसरे यांच्या पुस्तकाच्या शीर्षकावर आक्षेप घेत आमदार संजय गायकवाड यांनी प्रकाशक प्रशांत आंबी यांना दूरध्वनीवरून शिवीगाळ केली आहे. या शीर्षकातून महाराजांचा अनादर होतो असा दावा करत गायकवाड यांनी आंबी यांना शिवीगाळ केली तसंच जीवे मारण्याची धमकी दिली. गायकवाड यांनी माध्यमांसमोर आपण शिवीगाळ केल्याचं कबूल केलं असून हे शीर्षक महाराजांचा अपमान करणारं असल्याचा दावा केला आहे. यावरून गायकवाड यांच्यावर अनेक पक्ष, संघटनांकडून टीका होत आहे. गायकवाड यांची भाषा पाहता त्यांना शिवाजी महाराजांचं नाव घ्यायचा अधिकार नाही, महाराष्ट्राचा पुरोगामी विचार पुसण्याचा प्रयत्न अशा व्यक्तींमुळे होतो अशी टीका कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली. गायकवाड यांनी आंबी यांना खूनाची धमकी दिल्यामुळे आंबी यांना पोलिस संरक्षण द्यावं अशी मागणी सपकाळ

यांनी केली आहे. त्याचप्रमाणे मुख्यमंत्र्यांनी या घटनेची चौकशी करून गायकवाड यांच्यावर कठोर कारवाई करावी अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

## निधन

हिंगोली विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आणि भाज्यपचे ज्येष्ठ नेते बळीराम पाटील कोटकर यांचं आज पहाटे ३ वाजता वृद्धापकाळानं निधन झालं. ते ७८ वर्षांचे होते. कोटकर यांनी सुरुवातीला पोलीस पाटील म्हणून आणि नंतर सरपंच म्हणून काम पाहिलं होतं. कुठलाही राजकीय वारसा नसताना त्यांनी राजकारणात कारकिर्द केली होती.

## भोंदू बाबा खरात

भोंदूबाबा अशोक खरातला लैंगिक अत्याचार आणि शोषणाच्या पाचव्या प्रकरणात नाशिक न्यायालयाने ६ मे पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. कौटुंबिक समस्यांसाठी मदतीसाठी आलेल्या विवाहित महिलेचे लैंगिक शोषण केल्याप्रकरणी ही तक्रार दाखल झाली होती.

## हवामान

विदर्भात वर्धा आणि अकोला इथं उद्या उष्णतेच्या लाटेचा येलो अलर्ट जारी करण्यात आला आहे. तर परवा अकोला, अमरावती आणि वर्धा जिल्ह्यांमध्ये उष्णतेची लाट कायम राहणार असून 26 तारखेला विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमध्ये तापमानात वाढ होण्याची शक्यता प्रादेशिक हवामान खात्यांनं वर्तवली आहे. दरम्यान आज नागपुरात 42 पूर्णांक ४ दशांश अंश इतकं कमाल शुष्क तापमान नोंदवण्यात आलं.

## होर्मुजची सामुद्रधुनी

अमेरिका आणि इस्रायलने शस्त्रसंधीचं उल्लंघन केल्यामुळे होर्मुजची सामुद्रधुनी उघडता येणार नाही असं इराणने म्हटलं आहे. अमेरिकेने इराणच्या बंदरांवर नाकेबंदी केली आहे, यामुळे जागतिक अर्थव्यवस्था वेठीस धरली जात आहे तसंच इस्रायलही युद्धखोरी करत आहे, असं इराणच्या संसदेचे सभापती मोहम्मद बागेर गालीबाफ यांनी समाजमाध्यमावरल्या संदेशात म्हटलं आहे. इराण चर्चेला तयार आहे, मात्र अमेरिकेने केलेली नाकेबंदी, आश्वासनांचं उल्लंघन आणि धमक्या यामुळे चर्चेत अडथळा येत आहे, असं इराणचे राष्ट्राध्यक्ष मसुद पेझेश्कियान म्हणाले.

*****